# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/08/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## विनयभंग

**पो.स्टे. कोंढाळी** :— दिनांक १७/०८/२०२३ चे १५.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही घरी हजर असता आरोपी नामे— मुकेश मनोहर खवसे, रा. चंदनपार्डी हा घरात आला व पिण्यासाठी पाणी दया असे म्हटले असता फिर्यादीने पिण्यास पाणी दिल्यावर आरोपीने फिर्यादीचा उजवा हात पकडला व फिर्यादीस अब्रुस लज्जा येईल असे कुत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४, ३५४(अ) भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुनिल बन्सोड मो. नं. १५६४ मो. क्र. ९७६४०९०२०८ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. रामटेक** :— दिनांक १५/०८/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक १६/०८/२०२३ चे ०७.०० वा. सुमारास पो.स्टे. रामटेक हद्यीत फिर्यादि याचा मुलगा वय १७ हा वर्ग ११ वी मध्ये शिक्षण घेत आहे. दिनांक १५/०८/२०२३ रोजी रात्री ०८/०० वा. दरम्यान मुलगा घरी हजर असता त्याला म्हटले की, तु रोडचे कामावर जावु नको पंधरा दिवसापासुन तुझी शाळा जात आहे. तो म्हणाला की मी रोडचे कामावर जाणारच मी शाळेत जात नाही. त्यानंतर फिर्यादी रात्री १०/०० वा जेवन करून झोपुन राहीले. दि. १६/०८/२०२३ रोजी ०७/०० वा. झोपुन उठले मुलगा हा घरी दिसुन आला नाही. त्याचा गावात नातेवाईक इतरत्र शोध घेतला मिळुन आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कार्तिक सोनटक्के मो. नं. ९४०५९०३५२८ करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर